**विशेष दिवाणी मुकदमा क्र.१०९/२०२३**
**निशाणी क्र.१९८ लगत**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्रं.१ ते १० तर्फे ॲड.जी. एस. भोसले</u> :**

हे म्हणणे खरे आहे की पळशी, ता.खंडाळा येथे भरगुडे आडनावाची भरपुर माणसे आहेत. हे मला सांगता येणार नाही की सदर भरगुडे हे एकविचाराचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझे संपुर्ण कुटूंब एकविचाराचे आहे. हे म्हणणे खरे आहे की मी, माझे चुलत भाऊ व त्यांची मुले सगळे एकच आहोत. हे म्हणणे खरे आहे की दत्तात्रय भरगुडे हा माझा चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की वाद मिळकत ही मुळची कोणाच्या मालकीची आहे याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की ती कुठे आहे याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मला दावा मिळकतीच्या चतु:सिमा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकतीचे पुर्वी काय व्यवहार झाले आहेत याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्रं.१ ते ८ हे माझ्या पाहण्यातले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की ते सर्व इतर समाजाचे लोक आहेत. हे म्हणणे खरे नाही की ते इतर समाजाचे असल्यामुळे आम्ही त्यांना वेगळे केले. हे म्हणणे खरे आहे की नकुसाबाई हिला मी कधीही पाहिलेले नाही. हे मला माहिती नाही की नकुसाबाई ही पुर्वी आमच्या गावची ग्रामपंचायत सदस्य होती. हे म्हणणे खरे नाही की तिने सांगितले की माझा काही संबंध नाही असे सांगा. हे म्हणणे खरे आहे की सरतपासातील परिच्छेद क्रं.२ मधील मजकुर मला काहीही माहिती नसताना नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की वादी हा आमच्या गावातील आहे व तो आमच्या नात्यातील नाही. हे म्हणणे खरे आहे की तो पुण्यात कुठे राहतो याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की भावाने सांगितल्याप्रमाणे मी साक्ष देत आहे. माझा भाऊ सन २०१७ मध्ये मयत झाला. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीची सन २०१७ पुर्वीची कोणतीही माहिती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत आमची वडिलार्जित नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकतीबाबतचा आमच्या कुटूंबाशी कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकतीशी माझा वैयक्तीक संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत

भावाने मला करायची सांगितली हे दाखविणारा लेखी कागद आजअखेर दाखल केलेला नाही. भावाने मला जमीन करायची सांगितली हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास मी तयार नाही. हे म्हणणे खरे आहे की याच प्रकरणामध्ये मी यापुर्वी याच न्यायालयात आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की मी पुणे येथे नोकरी करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की माझा मोठा भाऊ वारल्यानंतर मी गावी आलो. हे म्हणणे खरे नाही की भाऊ वारल्यानंतर दोन वर्षांनी मी गावी आलो. सन २०१७ ते २०१९ च्या मधे मी पळशी गावात मतदान केले हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की मला जे सांगायला सांगितले ते मी सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी पळशी गावच्या सोसायटीचा सन २०२० पर्यंत सदस्य नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की मी गावी आल्यानंतर सोसायटीचा सदस्य म्हणुन मतदान करतो. हे म्हणणे खरे नाही की सन २०२० मध्ये मी पळशी गावामध्ये मतदान करायला सुरुवात केली. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीची लांबी व रुंदी किती आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीच्या चारही बाजुला शेती आहे असे माझे म्हणणे आहे. माझ्या भावाचे नाव नामदेव तुकाराम भरगुडे आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे मला आठवत नाही की सरतपासातील मजकुर कुठे लिहला होता व तो कोणी टाईप केला. हे म्हणणे खरे आहे की मी सरतपासावर सही केली व ते दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की मला सांगितल्यामुळे मी साक्ष दयायला आलो. हे म्हणणे खरे नाही की साक्ष काय दयायची हे मला त्यांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की वादीला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझी सदर मिळकतीत कधीही कब्जेवहिवाट नव्हती.

उलटतपास संपला. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई. (ए. ए. पाचरणे)

दिनांक :१२.०९.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.